Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 3RD MARCH 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या खालीं लिहिलेल्या आक्टास आलीजाह गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २१ माहे जानेवारी सन १८९८ रोजीं संमति दिली; आणि तो सर्वांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

### सन १८९८ चा आक्ट २ रा.

**इंग्लंडांत घेतलेल्या सोन्याच्या तारणावर चलनी* नोटी देण्याविषयीं ठराव करण्याकरितां आक्ट.**

ज्या अर्थी, इंग्लंडांत घेतलेल्या सोन्याच्या तारणावर चलनी नोटी देण्याविषयीं ठराव करणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) ह्या आक्टास सन १८९८ चा हिंदुस्थानचा कागदी नाण्याविषयीं आक्ट असें ह्मणावें. — लहान सरनामा, सुरुवात व मुदत.

(२) तो एकदम अमलांत येईल; आणि

(३) तो त्याच्या सुरुवातीपासून साहा महिनेपर्यंत अमलांत राहील, जास्त वेळ अमलांत राहणार नाहीं.

२. सन १८८२ चा हिंदुस्थानचा कागदी नाण्याविषयीं आक्ट, ह्यांच्या १३ व्या कलमानंतर खालील कलम जास्त दाखल करावें : तें येणेंप्रमाणें :— — सन १८८२ चा आक्ट २०, कलम १३, ह्यानंतर नवीन कलम दाखल करणें.

* नाण्याच्या.

इंग्लंडांत घेतलेल्या सोन्याचे बदल: नोटी देणें.

"१३ अ. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, वेळोवेळीं, इंडिया गझेटांत हुकुम जाहीर करून त्याच्या द्वारें असें फर्मीविण्याचा अधिकार आहे कीं, त्या हुकुमांत नोटी देण्याचीं आफिसें ह्मणून सांगितलीं असतील तेथें, सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया यांनीं हवालीं घेतलेल्या सोन्याच्या किंमती इतक्या रकमेपर्यंत, त्या हुकुमांत ठरविलेल्या भावानें व शर्तीनिशीं, चलनी नोटी द्याव्या:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं—

(१) सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया हे, जितक्या सोन्याच्या नाण्याची किंवा सोन्याची किंमत सदहूप्रमाणें दिलेल्या नोटींच्या किमती इतकी आहे ह्मणून ठरवितील, तितकें सोन्याचें नाणें किंवा सोनें हें, त्या नोटींची बिनधोक फेड होण्यासाठीं, तें सोनें किंवा त्याच्या इतका ह्मणून ते ठरवितील तितका ऐवज ते सोन्याच्या नाण्याच्या किंवा सोन्याच्या रूपानें हिंदुस्थानास पाठवीत तोंपर्यंत, अगर हिंदुस्थान सरकार, अशा नोटींच्या किंमती इतकी आपल्या नाण्याची रकम, कलम १९ ह्याप्रमाणें राखून ठेवावयाच्या ऐवजापोटीं हिंदुस्थानांत त्या कामासाठीं निराळी काढून ठेवी तोंपर्यंत, आपल्या हवालीं राखून ठेवण्याविषयीं त्यांनीं संमती दिल्यावांचून ह्या कलमांत दिलेला अधिकार चालवितां कामा नये;

(२) ह्याप्रमाणें पाठविलेलें सोन्याचें नाणें किंवा सोनें, हिंदुस्थानांत गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं घेतलें ह्मणजे तें, कलम १९ ह्याच्या अर्थाअन्वयें आलेलें आहे असें समजलें पाहिजे; आणि

(३) ह्याप्रमाणें ठेवून घेतलेलें सोन्याचें नाणें किंवा सोनें हिंदुस्थानांत येऊन पोंहचे तोंपर्यंत त्याचा हिशोब, कलम २७ अन्वयें प्रसिद्ध करावयाच्या हिशोबाच्या तेरिजांत, इतर सोन्याच्या नाण्याहून किंवा सोन्याहून निराळा दाखविला पाहिजे.

(सही) जे. एम् म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.